महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
सद्‍रक्षाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट दि.०१/१०/२०२४

## “ सन २०२४ नवरात्रौत्सव व पोलीस बंदोबस्ताबाबत माहिती”

सालाबादप्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालयात **दिनांक ०३/१०/२०२४ ते दिनांक १२/१०/२०२४** या दरम्यान हिंदू धर्मियांचा **नवरात्रौत्सव** साजरा होणार आहे. त्यात ६०९ सार्वजनिक व ३२७८ खाजगी दुर्गादेवी मुर्तींची स्थापना होणार आहे तसेच एकुण १४१ सार्वजनिक व २६० खाजगी देवीचे फोटो/प्रतिमांची स्थापना होणार आहे. सदर कालावधीत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकुण ५७२ ठिकाणी सार्वजनिक व ५०३ ठिकाणी खाजगी गरब्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याव्यतिरीक्त सांस्कृतिक कार्याक्रम, भजन, आर.एस.एस. पथसंचलन, दुर्गा दौड, यात्रा, रावण दहन इत्यादी कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले आहे. सदर उत्सवादरम्यान नागरिकांमध्ये अतिशय उत्साहाचे व धार्मिक वातावरण असते. त्यामुळे सदर उत्सवादरम्यान कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन शांतताभंग होणार नाही या दृष्ट्रीकोनातुन जास्तीत जास्त पोलीस मनुष्यबळ तसेच साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

नवरात्रौत्सवात जास्तीत जास्त महिला/मुली या रास गरबा/दांडिया खेळण्यासाठी जमा होत असतात त्यावेळी त्यांची छेडछाड, विनयभंग, चैन/मोबाईल/पर्स/बॅग स्नॅचिंग होवु नये, कार्यक्रमासाठी येणा-या भाविकांचे मोटारवाहनांची चोरी होवु नये तसेच धार्मिक भावना दुखावुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या दृष्ट्रीकोनातुन साध्या वेशातील जास्तीत जास्त पुरुष/महिला पोलीस अंमलदारांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

सदर कालावधीत धार्मिक तेढ निर्माण करणारे मॅसेजेस/पोस्ट, व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकुन काही समाजकंटक समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा समाजकंटकावर लक्ष ठेवुन त्वरीत कायदेशीर कारवाई करण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सोशल मिडीया सेल देखील सर्तक करण्यात आले आहे . तसेच असे काही मॅसेजेस, पोस्ट, व्हिडीओ बाबत माहिती मिळाल्यास त्वरीत नजिकच्या पोलीस ठाण्यास संपर्क साधण्याबाबत पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडुन जनतेला अवाहन देखील करण्यात आले आहे.

सदर नवरात्रौत्सव शांततेत पार पडावा या अनुषंगाने अपर पोलीस आयुक्त-०४, पोलीस उप आयुक्त-०९, सहाय्यक पोलीस आयुक्त-१५, पोलिस निरीक्षक-९१, सपोनि/पोउपनि-२८३, महिला पोलीस अधिकारी-२९, पुरुष अंमलदार -२५५२, महिला अंमलदार- ५४७, एसआरपीएफ कंपनी-०३, क्युआरटी प्लॅटुन-०३ असा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

**पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडुन सर्व नागरिकांना नवरात्रौत्सवाच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.**

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर